# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४

क्र.कोविमं/माध्य.गोप./ 1555
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक - २२.०८.२०१९

प्रति,
मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :- इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी च्या विषय योजना व सुधारीत मुल्यमापन योजनेबाबत...**
**संदर्भ :- क्रमांक रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.९ वी व १० वी ची विषय योजना व सुधारीत मुल्यमापन योजना/४२४०, दि. १६.०८.२०१९**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी च्या विषय योजना व सुधारीत मुल्यमापन योजनेबाबतचे राज्य मंडळाचे संदर्भीय परिपत्रक सोबत जोडण्यात येत आहे. परिपत्रकामधील सूचना आपल्या शाळेमधील शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून दयाव्यात व परिपत्रकानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत - परिपत्रक (एकूण ०९ पृष्ठे)

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४

**परिपत्रक क्रमांक रा.मं/पापुअ/पापुई/संशोधन/इ.९ वी व १०वीची विषय योजना व सुधारित मूल्यमापन योजना/४२४० , दिनांक- १६/०८/२०१९.**

संदर्भ-१.मा.संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विदया प्राधिकरण ) यांचे जा.क्र.मराशैसंप्रप/अविवि/इ.१०वी विषय योजना व मूल्यमापन/२०१८-१९/२७३३/ दिनांक १४.०६.२०१८.

२.शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१९/प्र.क(२४३/१९)/ एसडी-४, दिनांक ०८ ऑगस्ट,२०१९

**विषय: इयत्ता ९वी व इ.१० वी च्या विषय योजना व सुधारित मूल्यमापन योजनेबाबत...**

या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून इ.९वी साठी व शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून इ.१०वी साठी पुर्नरचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विदया प्राधिकरण), पुणे-३० यांच्यामार्फत करण्यात आलेली आहे.

सदर पुर्नरचित अभ्यासक्रमाच्या इ.९ वी व इ.१०वीच्या मूल्यमापन योजनेचा पुनर्विचार करण्याकरिता शासन निर्णय दिनांक ०९ जुलै,२०१९ अन्वये शिक्षण आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. संबंधित समितीने शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशी विचारात घेऊन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१९/प्र.क (२४३/१९)/ एसडी-४, दिनांक ०८ ऑगस्ट,२०१९ अन्वये इ.९वी व इ.१०वी करिता शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून विषय योजना व सुधारित मूल्यमापन योजना खालीलप्रमाणे लागू करण्यात येत आहे.

१.लेखी मूल्यमापना सोबत विद्यार्थ्यांच्या वेगवेगळया क्षमतांचे मापन करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे सातत्यपूर्ण मूल्यमापन होण्यासाठी अंतर्गत मूल्यमापन समाविष्ट करण्यात येत आहे.

२.इ.९वी व इ.१०वीकरिता भाषा आणि सामाजिकशास्त्रे या विषयांकरिता लेखी परीक्षेव्दारे मूल्यमापन ८० गुणांचे व अंतर्गत मूल्यमापन २० गुणांचे राहील.

३.मंडळामार्फत घेण्यात येणारी इ.१०वीची अंतिम परीक्षा ही केवळ इ.१०वीच्या अभ्यासक्रमावर आधारित राहील.

४.अंतर्गत मूल्यमापनामध्ये विद्यार्थ्यांकरिता दयावयाचे प्रकल्प हे समावेशित स्वरूपाचे राहतील व हे प्रकल्प शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून वर्गात करून घ्यावयाचे आहेत.

५.इ.९वी व इ.१०वी मध्ये उत्तीर्ण होण्याकरिता विद्यार्थ्यांस प्रत्येक विषयात लेखी व अंतर्गत मूल्यमापन (तोंडी परीक्षा /प्रात्यक्षिक परीक्षा /बहुपर्यायी प्रश्न परीक्षा व उपक्रम) मिळून किमान ३५ टक्के गुण प्राप्त करणे अनिवार्य राहील.

६.मंडळाच्या प्रचलित निकषांप्रमाणे सवलतीच्या गुणांची तरतूद (Grace Marks System) सुरू राहील. तसेच शास्त्रीय कला, चित्रकला, लोककला व क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या/सहभागी होणा-या तसेच स्काऊट व गाईड मध्ये सहभागी होणा--या विद्यार्थ्यांना देण्यात येणारे सवलतीचे अतिरिक्त गुण प्रचलित निकषाप्रमाणे सुरू राहतील.

७.इ.९वी साठी मूल्यमापन योजना Annexure-A प्रमाणे, इ.१०वी साठी मूल्यमापन योजना Annexure- B व इ.९वी व इ.१०वी मूल्यमपान योजना Annexure- C प्रमाणे राहील. (सोबत Annexure-A, Annexure B व Annexure C ची एकूण ७ पृष्ठे )

या व्यतिरिक्त शासन निर्देशांप्रमाणे वेळोवेळी होणारे बदल स्वतंत्र परिपत्रकान्वये सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना यथावकाश कळविण्यात येतील.

२..

1235

वरील सर्व सूचना आपल्या विभागातील मान्यताप्राप्त सर्व माध्यमिक शाळांमधील शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणून द्याव्यात व सदर परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी. सदर परिपत्रक मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. यासंदर्भातील प्रशिक्षणाबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे ०४

प्रति,

विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण विभागीय मंडळ- पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, रत्नागिरी यांना कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांच्या प्रमुखांना त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:**

१) मा.शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे.
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
३) सर्व शिक्षणाधिकारी(माध्यमिक), सर्व जिल्हा परिषद.
४) शिक्षण निरिक्षक, उत्तर/दक्षिण/पश्चिम, मुंबई.
५) गणकयंत्र विभाग व सर्व संबंधित शाखा, राज्य मंडळ, पुणे.

**प्रत माहितीसाठी सादर:**

१) मा.सहसचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
२) मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, शिक्षण आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१.
३) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद **(विदया प्राधिकरण)**, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे- ४११०३०.
४) मा.संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती), सेनापती बापट मार्ग, पुणे-४११००४.

**ANNEXURE - A**

## * इ.९ वी साठी विषयनिहाय मूल्यमापन योजना –

- **'भाषा'** विषयांसाठी लेखी परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापनाची गुणविभागणी पुढीलप्रमाणे–

| प्रथम सत्र | व्दितीय सत्र |
|---|---|
| लेखी परीक्षा –८० गुण | लेखी परीक्षा –८० गुण |
| अंतर्गत मूल्यमापन –२० गुण | अंतर्गत मूल्यमापन –२० गुण |
| १) तोडी परीक्षा–<br>श्रवण कौशल्य –५ गुण<br>भाषण कौशल्य –५ गुण | १) तोडी परीक्षा–<br>श्रवण कौशल्य –५ गुण<br>भाषण कौशल्य –५ गुण |
| २) स्वाध्याय –प्रत्येकी ५ गुणांचे २ स्वाध्याय घ्यावेत– १० गुण | २) स्वाध्याय – प्रत्येकी ५ गुणांचे २ स्वाध्याय घ्यावेत– १० गुण |

तोंडी परीक्षेकरिता पुढील २ कौशल्ये निवडण्यात यावीत.

- **श्रवण कौशल्य –(खालीलपैकी कोणतेही एक) (५ गुण)**

१. परिच्छेद ऐकून त्यावर आधारित विचारलेल्या वस्तूनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिणे (किमान ५ प्रश्न)
२. ५ वाक्य किंवा १० शब्द ऐकून लिहिणे.
३. कविता ऐकून त्यावर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिणे. (किमान ५)
४. Audio Clip ऐकून त्यावर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिणे. (किमान ५)

- **भाषण कौशल्य –(खालीलपैकी कोणतेही एक) (५ गुण)**

१. वाचन केलेल्या कोणत्याही एका पुस्तकाविषयीचे स्वमत प्रकट करावे.
२. दिलेल्या विषयांवर विचार प्रकट करावे. (सदर विषय विद्यार्थ्यांच्या अनुभव विश्वाशी सुसंगत असावेत.)
३. पाठयपुस्तकातील पाठ किंवा कविता यावर ८ ते १० वाक्यांमध्ये आपले विचार प्रकट करावेत.

- भाषा विषयांच्या अंतर्गत मूल्यमापनातील तोंडी परीक्षेचे प्रत्येक विद्यार्थ्यांचे (कौशल्यातील ज्या पर्यायाची निवड केली आहे, त्याप्रमाणे ) खालील अभिलेख शाळा स्तरावर जतन करणे अनिवार्य राहील.
  १) श्रवण कौशल्य (उदा.श्रवण,आकलनाच्या उत्तरपत्रिका जमा करणे).
  २) भाषण कौशल्य (उदा. वाचलेल्या पुस्तकाबददल विद्यार्थ्यांचे स्वमत).

## * भाषा विषय उत्तीर्णतेचे निकष –

- परीक्षा प्रथम सत्र– १०० गुण + व्दितीय सत्र – १०० गुण = २००/२= १०० गुण सरासरी. याप्रमाणे ३ भाषांचे १०० प्रमाणे सरासरी ३०० गुण.

- ३०० गुणांच्या तीन भाषा विषयांचा गट उत्तीर्णतेसाठी एकत्रित असेल. या तीन भाषा विषयांच्या एकत्रित गटामध्ये उत्तीर्णतेसाठी किमान १०५ गुण आवश्यक राहील. त्यापैकी १०० गुणांच्या भाषा विषयांमध्ये किमान २५ व दोन्ही संयुक्त भाषा विषयांमध्ये मिळून किमान २५ गुण प्राप्त होणे आवश्यक राहील.

✻ **गणित** विषयासाठी लेखी आणि अंतर्गत मूल्यमापनाची गुणविभागणी पुढीलप्रमाणे –

| प्रथम सत्र | व्दितीय सत्र |
|---|---|
| लेखी परीक्षा –८० गुण | लेखी परीक्षा –८० गुण |
| गणित भाग १ (बीजगणित)-४० गुण | गणित भाग १ (बीजगणित)-४० गुण |
| गणित भाग २ (भूमिती) -४० गुण | गणित भाग २ (भूमिती) -४० गुण |
| अंतर्गत मूल्यमापन –२० गुण<br><br>१ ) गृहपाठ –२ गृहपाठ (गणित भाग १ व भाग २ प्रत्येकी एक )यावर आधारित (प्रत्येकी ५ गुण) – १० गुण<br><br>२) प्रात्यक्षिक परीक्षा/बहुपर्यायी प्रश्न परीक्षा( भाग १–१० गुण व भाग २–१० गुण) या २० गुणांचे रूपांतर १० गुणांत करावे. | अंतर्गत मूल्यमापन –२० गुण<br><br>१ ) गृहपाठ –२ गृहपाठ (गणित भाग १ व भाग २ प्रत्येकी एक )यावर आधारित (प्रत्येकी ५ गुण) – १० गुण<br><br>२) प्रात्यक्षिक परीक्षा/बहुपर्यायी प्रश्न परीक्षा( भाग १–१० गुण व भाग २–१० गुण) या २० गुणांचे रूपांतर १० गुणांत करावे. |

- प्रथम सत्र परीक्षा – १०० गुण + व्दितीय सत्र परीक्षा –१०० गुण = २००/२= १०० गुण सरासरी.

✻ **विज्ञान व तंत्रज्ञान** विषयासाठी लेखी आणि अंतर्गत मूल्यमापनाची गुणविभागणी पुढीलप्रमाणे –

| प्रथम सत्र | व्दितीय सत्र |
|---|---|
| विज्ञान भाग १ –४० गुण | विज्ञान भाग १ –४० गुण |
| विज्ञान भाग २ –४० गुण | विज्ञान भाग २ –४० गुण |
| प्रात्यक्षिक परीक्षा व उपक्रम –२० गुण<br>प्रयोग –१२ गुण (पेपर १–६ गुण, पेपर २–६ गुण)<br>नोंदवही –०४ गुण (पेपर १–२ गुण, पेपर २ –२ गुण)<br>उपक्रम नोंदणी –०४ गुण (पेपर १–२ गुण,पेपर२ –२गुण)<br>उपक्रम नोंदवही शाळास्तरावर ठेवणे आवश्यक राहील. | प्रात्यक्षिक परीक्षा व उपक्रम –२० गुण<br>प्रयोग –१२ गुण (पेपर १–६ गुण, पेपर २–६ गुण)<br>नोंदवही – ०४ गुण (पेपर १–२ गुण, पेपर२ –२ गुण)<br>उपक्रम नोंदणी –०४ गुण (पेपर १–२ गुण, पेपर २–२ गुण)<br>उपक्रम नोंदवही शाळास्तरावर ठेवणे आवश्यक राहील. |

- प्रथम सत्र परीक्षा – १०० गुण + व्दितीय सत्र परीक्षा –१०० गुण = २००/२= १०० गुण सरासरी.

- उत्तीर्णतेसाठी गणित व विज्ञान विषयांचा एक गट असेल. दोन्ही विषयांच्या एकत्रित गटामध्ये उत्तीर्णतेसाठी २०० गुणांपैकी किमान ७० गुण प्राप्त होणे आवश्यक आहे व त्यापैकी प्रत्येक विषयात किमान २५ गुण प्राप्त होणे आवश्यक राहील.

* **सामाजिक शास्त्रे** विषयासाठी लेखी आणि अंतर्गत मूल्यमापनाची गुणविभागणी पुढीलप्रमाणे –

| **प्रथम सत्र** | **व्दितीय सत्र** |
|---|---|
| इतिहास व राज्यशास्त्र –२८ + १२ = ४० गुण | इतिहास व राज्यशास्त्र –२८ + १२ = ४० गुण |
| भूगोल = ४० गुण | भूगोल = ४० गुण |

**अंतर्गत मूल्यमापन = २० गुण (प्रथम व व्दितीय सत्रासाठी प्रत्येकी )**

| विषय | गृहपाठ (प्रत्येकी ५ गुणांचे) | गुण | रूपांतर (गुण) | बहुपर्यायी प्रश्न | गुण | रूपांतर (गुण) |
|---|---|---|---|---|---|---|
| इतिहास + राज्यशास्त्र | १ + १ | १० | ५ | १ चाचणी | ८ + २ | ५ |
| भूगोल | २ | १० | ५ | १ चाचणी | १० | ५ |

- प्रथम सत्र परीक्षा - १०० गुण + व्दितीय सत्र परीक्षा – १०० गुण = २००/२= १०० गुण सरासरी.
- इयत्ता ९वी मध्ये सराव चाचण्या, गृहपाठ व अन्य लेखी कार्य प्रचलित पध्दतीप्रमाणे सुरू राहील.

# ANNEXURE - B

## * इ.१० वीसाठी विषयनिहाय मूल्यमापन योजना -

- इ. १०वीच्या शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम सत्र परीक्षा, सराव परीक्षा (Preliminary Examination) इ.९ वीच्या विषयनिहाय मूल्यमापन आराखडयाप्रमाणे आयोजित केल्या जातील.
- राज्य मंडळामार्फत आयोजित माध्यमिक शालान्त (इ.१०वी) परीक्षा पुढील मूल्यमापन योजनेप्रमाणे राहील.

१. **भाषा** विषयांसाठी लेखी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापनाची गुणविभागणी पुढीलप्रमाणे -

| | |
|---|---|
| अंतिम लेखी परीक्षा | ८० गुण |
| अंतर्गत मूल्यमापन | २० गुण |
| १. तोंडी परीक्षा-<br>श्रवण कौशल्य - ५ गुण<br>भाषण कौशल्य - ५ गुण | १० गुण |
| २. स्वाध्याय - प्रत्येकी ५ गुणांचे २ स्वाध्याय घ्यावेत. | १० गुण |

तोंडी परीक्षेकरिता पुढील २ कौशल्ये निवडण्यात यावीत.

- **श्रवण कौशल्य - (खालीलपैकी कोणतेही एक) (५ गुण)**

  १. परिच्छेद ऐकून त्यावर आधारित विचारलेल्या वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिणे ( किमान ५ प्रश्न )

  २. वाक्य किंवा १० शब्द ऐकून लिहिणे.

  ३. कविता ऐकून त्यावर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिणे ( किमान ५ गुण)

  ४. Audio Clip ऐकून त्यावर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिणे. (किमान ५)

- **भाषण कौशल्य -(खालीलपैकी कोणतेही एक) (५ गुण )**

  १. वाचन केलेल्या कोणत्याही एका पुस्तकाविषयीचे स्वमत प्रकट करावे.
  २. दिलेल्या विषयांवर विचार प्रकट करावे. (सदर विषय विद्यार्थ्यांच्या अनुभव विश्वाशी सुसंगत असावेत.)
  ३. पाठयपुस्तकातील पाठ किंवा कविता यावर ८ ते १० वाक्यांमध्ये आपले विचार प्रकट करावेत.
  ४. भाषा विषयांच्या अंतर्गत मूल्यमापनातील तोंडी परीक्षेचे प्रत्येक विद्यार्थ्यांचे (कौशल्यातील ज्या पर्यायाची निवड केली आहे, त्याप्रमाणे ) खालील अभिलेख शाळा स्तरावर जतन करणे अनिवार्य राहील.

१) श्रवणकौशल्य (उदा.श्रवण,आकलनाच्या उत्तरपत्रिका जमा करणे).

२) भाषणकौशल्य (उदा. कोणत्याही वाचलेल्या एका पुस्तकाबददल विदयार्थ्यांचे स्वमत).

*** भाषा विषय उत्तीर्णतेचे निकष –**

- ३०० गुणांच्या तीन भाषा विषयांचा गट उत्तीर्णतेसाठी एकत्रित असेल. या तीन भाषा विषयांच्या एकत्रित गटामध्ये उत्तीर्णतेसाठी किमान १०५ गुण आवश्यक राहील. त्यापैकी १०० गुणांच्या भाषा विषयांमध्ये किमान २५ व दोन्ही संयुक्त भाषा विषयांमध्ये मिळून किमान २५ गुण प्राप्त होणे आवश्यक राहील.

२. **गणित** विषयासाठी लेखी आणि अंतर्गत मूल्यमापनाची गुणविभागणी पुढीलप्रमाणे राहील.

- अंतिम लेखी परीक्षा – ८० गुण

  गणित भाग १ (बीजगणित)- ४० गुण

  गणित भाग २ (भूमिती)- ४० गुण

- अंतर्गत मूल्यमापन – २०गुण
  - गृहपाठ–२ गृहपाठ (गणित भाग १ व भाग २ प्रत्येकी एक ) यावर आधारित (प्रत्येकी ५ गुण ) – १० गुण
  - प्रात्यक्षिक परीक्षा/बहुपर्यायी प्रश्न परीक्षा ( भाग १–१० गुण व भाग २–१० गुण) या २० गुणांचे रूपांतर १० गुणांत करावे.

**३. विज्ञान व तंत्रज्ञान** विषयासाठी लेखी आणि अंतर्गत मूल्यमापनाची गुणविभागणी पुढीलप्रमाणे राहील.

- अंतिम लेखी परीक्षा – ८० गुण

  विज्ञान भाग १ – ४० गुण

  विज्ञान भाग २ – ४० गुण

- **विज्ञान व तंत्रज्ञान** विषयासाठी अंतर्गत मूल्यमापनाची गुणविभागणी पुढीलप्रमाणे–

  प्रात्यक्षिक परीक्षा उपक्रम – २० गुण

  प्रयोग – १२ गुण ( भाग १–६ गुण, भाग २– ६ गुण)

  नोंदवही – ०४ गुण ( भाग १–२ गुण, भाग २– २ गुण)

  उपक्रम नोंदणी –०४ गुण ( भाग १–२ गुण, भाग २– २ गुण)

  उपक्रम नोंदवही शाळास्तरावर जतन करणे आवश्यक राहील.

८...

- प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षकांची नियुक्ती विभागीय मंडळाकडून करण्यात येईल.
- उत्तीर्णतेसाठी गणित व विज्ञान विषयांचा एक गट असेल. दोन्ही विषयांच्या एकत्रित गटामध्ये उत्तीर्णतेसाठी २०० गुणांपैकी किमान ७० गुण प्राप्त होणे अनिवार्य असेल व त्यापैकी प्रत्येक विषयात किमान २५ गुण प्राप्त होणे अनिवार्य राहील.

४. **सामाजिक शास्त्रे** विषयासाठी लेखी आणि अंतर्गत मूल्यमापनाची गुणविभागणी पुढीलप्रमाणे राहील.

- अंतिम लेखी परीक्षा – ८० गुण
- अंतर्गत मूल्यमापन = २० गुण
- इतिहास व राज्यशास्त्र २८ + १२ = ४० गुण
- भूगोल = ४० गुण

एकूण = १०० गुण

*** अंतर्गत मूल्यमापन = २० गुण पुढीलप्रमाणे –**

| विषय | गृहपाठ (प्रत्येकी ५ गुणांचे) | गुण | रूपांतर (गुण) | बहुपर्यायी प्रश्न | गुण | रूपांतर (गुण) |
|---|---|---|---|---|---|---|
| इतिहास + राज्यशास्त्र | १ + १ | १० | ५ | १ चाचणी | ८ + २ | ५ |
| भूगल | २ | १० | ५ | १ चाचणी | १० | ५ |

* इ.९ वी व इ.१०वीची विषय योजना व मूल्यमापन योजना याबाबतची माहिती **ANNEXURE - C** मध्ये तपशीलवार देण्यात आली आहे.

- इयत्ता ९वी,१० वीच्या श्रेणी विषयातील वैकल्पिक गटात **संरक्षणशास्त्र या विषयाला सद्यस्थितीत एम.सी.सी. (इ.९ साठी) स्काउड गाईड, नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा, एन.सी.सी. हे विषय सुरू आहेत. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून कार्यशिक्षण, समाजसेवा व व्होकेशनल V१,V२ इ. व्यवसाय विषयांचे पर्याय उपलब्ध राहतील.**

- **जलसुरक्षा** हा विषय श्रेणी विषयांमध्ये नव्याने समाविष्ठ करण्यात येत असून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून हा विषय श्रेणी विषयात अनिवार्य राहील, स्वविकास व कलारसास्वाद हा विषय संरक्षणशास्त्र या विषयासोबत वैकल्पिक गटात समाविष्ट असेल.

## ANNEXURE - C

*** इ.९ वी व १० वी मूल्यमापन योजना -**

| अ.क्र | विषय | लेखी परीक्षा | | | अंतर्गत/प्रात्यक्षिक परीक्षा | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्नपत्रिका संख्या | गुण | कालावधी तास | गुण | कालावधी तास | गुण |
| १ | प्रथम भाषा | ०१ | ८० | ०३ | २० | --- | १०० |
| २ | व्दितीय भाषा किंवा संयुक्त भाषा | ०१/०२ | ८०<br>४० + ४० | ०३<br>२ + २ | २०<br>१० + १० | --- | १०० |
| ३ | तृतीय भाषा | ०१ | ८० | ०३ | २० | --- | १०० |
| ४ | गणित (भाग १ -बीजगणित + भाग २-भूमिती) | ०२ | ८०<br>(४०+ ४०) | २ तास<br>प्रत्येकी | २०<br>(१० + १०) | --- | १०० |
| ५ | विज्ञान अणि तंत्रज्ञान | ०२ | ४० + ४० | २ तास<br>प्रत्येकी | २०<br>(१० + १०) | २ तास | १०० |
| ६ | सामाजिक शास्त्रे<br>**अ**) इतिहास व राज्यशास्त्र<br>**ब**) भूगोल | <br>०१<br>०१ | <br>४०<br>(२८ + १२)<br>४० | <br>२ तास<br>२ तास | <br>१०<br>१० | <br>----<br>---- | १०० |
| ७ | **NSQF** व्यवसाय विषय (मराठी व इंग्रजी भाषा वगळता अन्य भाषा व सामाजिक शास्त्र विषयास पर्याय) | ०१ | ३०<br>(८० गुणांची परीक्षा घेऊन ३० गुणात रूपांतर ) | ३ तास | ७० गुण | ३ तास | १०० |
| ८ | आरोग्य व शारीरिक शिक्षण | | | | | | श्रेणी |
| ९ | स्व-विकास व कलारसास्वाद ** | | | | | | श्रेणी |
| १० | संरक्षणशास्त्र किंवा एम.सी.सी. (इ.९वी साठी)/ स्काउट गाईड/ नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा/ एन.सी.सी,कार्यशिक्षण/ समाजसेवा )/व्यवसाय विषय - (V१, V२ इ. ) | | | | | | श्रेणी |
| | एकूण | | | | | | ६०० |

- **जलसुरक्षा** हा विषय श्रेणी विषयांमध्ये नव्याने समाविष्ठ करण्यात येत असून पुढील वर्षापासून (२०२०-२१) हा विषय स्वविकास व कलारसास्वाद या श्रेणी विषयांऐवजी श्रेणी व अनिवार्य स्वरूपाचा असेल व स्वविकास व कलारसास्वाद हा विषय संरक्षण शास्त्राला अन्य पर्यायी विषयांसोबत उपलब्ध असेल.

*****